Review of Research

International Online Multidisciplinary Journal

Volume - 7 | Issue - 3 | December – 2017

5.2331(UIF)    2249-894X

# केशवसुतांची सामाजिक कविता



N. J. Suryawanshi
Asst. Professor (Industrial Chemistry)
Arts, Science & Commerce College,
Chikhaldara

प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल

प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल

सहयोगी प्राध्यापक , कला, विज्ञान व वाणिज्य महा. चिखलदरा, जि. अमरावती

प्रस्तावना :–केंशवसुतांची सामाजिक कविता आजही प्रस्तुत आहे. तीवर चर्चाही भरपूर झालेली आहे. आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते म्हणून त्यांना जे मानल्या जाते त्यामागे त्यांची ............


Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

International Online Multidisciplinary Journal

# Review of Research

Save Tree. Save Paper. Save World

ISSN NO:-2249-894 Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 7 | Issue - 3 | December - 2017




| Sr. No | Title And Name Of The Author (S) | Page No |
|---|---|---|
| 1 | ATTITUDE OF THE STUDENT TEACHERS TOWARDS HUMAN RIGHTS EDUCATION IN RELATION TO TEACHING TECHNIQUES<br>Dr. M. Chandravathana | 1 |
| 2 | PROBLEMS OF THE MARGINALIZED IN NTOZAKE SHANGE'S "FOR COLORED GIRLS"<br>Dr. R. Bakyaraj | 5 |
| 3 | DEVELOPING STRATEGIES FOR BETTER TEACHER ACCOUNTABILITY AMONG SECONDARY SCHOOL TEACHERS<br>Dr. N. S. Sumamol | 9 |
| 4 | TECHNO-ECONOMICS & ADVANCES OF SHUTTLE-LESS WEAVING TECHNOLOGY<br>Dr. V. M. Patil | 16 |
| 5 | A STUDY ON THE PRODUCTIVITY AND PROFITABILITY OF INDIAN BANK<br>Mrs. R. V. Hema | 28 |
| 6 | ORGANIC DAIRY FARMING : A NEW APPROACH IN DIARY SECTOR<br>Dr. Naushad Makbool Mujawar | 37 |
| 7 | A LITERATURE REVIEW ON IMPACT OF MODERN RETAILING/MALLS ON TRADITIONAL RETAILING IN INDIA<br>Dr. Vijay Grewal and Jaya Kameriya | 40 |
| 8 | केशवसुतांची सामाजिक कविता<br>प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल | 45 |
| 9 | कृष्णा अग्निहोत्री<br>प्रा. डॉ. प्राजक्ता प्रकाश जोशी | 51 |

67

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER - 2017

# केशवसुतांची सामाजिक कविता

प्रा. डॉ. आनंद वसंत डुबूल
सहयोगी प्राध्यापक , कला, विज्ञान व वाणिज्य महा. चिखलदरा, जि. अमरावती

**प्रस्तावना :–**

केशवसुतांची सामाजिक कविता आजही प्रस्तुत आहे. तीवर चर्चाही भरपूर झालेली आहे. आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते म्हणून त्यांना जे मानल्या जाते त्यामागे त्यांची समाजसन्मुखता आहे. मराठी कवितेतील सामाजिकतेला एक वैशिष्ट्यपूर्ण वळण केशवसुतांनी दिले आहे.

आगबोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस ही कविता एक स्वैर कल्पना विलास आहे. एका व्यथित मनाचा हा कल्पना विलास आहे आणि या व्यथेमागे नरालागीं येथे नरच चरणांही तुडवितो. ही कटू वस्तुस्थिती आहे. नरेच केला हीन किती नर या पंक्तीमधून हीच वस्तुस्थिती व्यक्त होते. यामध्ये नराच्या दुःखाची वस्तुनिष्ठ मीमांसाही आहे. सुप्रसिद्ध कर्मविपाक येथे नाही. नराच्या दुःखाचे नरबाह्य कारण केशवसुत समजू षकतात पण नरानेच नराचे शोषण करावे. यामुळे त्यांना प्रचंड त्वेष चढतो.

**गुलामां आणाया निघतील कुणी दुष्ट नर ते,**
**तरी त्यांची फोडू अचुक खडकी ती गलबतें !–**
**नरांलागी त्या गे त्वरित अधमां ओढुनि करीं**
**समुद्राच्या खालीं दडपुनि भरु नकविवरी !**

स्वैर कल्पनाविलास उधळून शोषकांवर निर्दयपणे प्रहार करण्यास कवी सरसावतो. गुलामांचे शोषण जसे संतापजनक तसा अंत्यजांशी होणारा व्यवहारही. अत्यंजाचे निरागस मूल एक प्रश्न उपस्थित करते व त्याचे थातुरमातुर उत्तर शोषण व्यवस्था निमूटपणे मान्य करणारी त्याची आई या पार्श्वभूमीवर उच्चवर्णीयांचा अंत्यजांशी होणारा अभद्र व्यवहार गडदपणे चित्रित होतो. पण

**गाढवा ! सावली ना पडेल ! दुरी हो ! पहा हाच खाउ मिळेल.**
**जरी त्यावरी सांवली माझी गेली, तरी काय बाधा असे ठेविलेली ?**



या सपक ओळी व शेवटच्या कडव्यातील

**हे परी काय तीतें ! कळे की जगी नाडुनिया परांतें !**
**म्हणूनी करुनी अधी पोर पाप, जनी गाजवी मानवी स्वप्रताप !**

असे सर्वसाधारण विधान करण्याचा त्यांना पडलेला मोह यामुळे कविता परिणामकारक ठरत नाही. मजुरावर उपासमारीची पाळी ही कविता मात्र वरील कवितेपेक्षा सरस उरलेली आहे. येथेही

मजुराकरवी केशवसुतांनी देवच वेठीस धरला आहे. त्याच्या विषम व्यवस्थेबद्दल त्याला प्रश्नांकित केले आहे.

गुलाम, अंत्यज, मजूर या बरोबर स्त्रीदास्यही त्यांना अस्वस्थ करते. ज्या रूढी स्त्रियांना डांबून ठेवतात त्यांना ते रुढीकाराक्षसी म्हणतात हरिभाउंच्या पात्रांची तुलना प्रतिष्ठित कथा–पुराण–कविता ग्रंथातील दुष्टास दंड देणा–या व दुर्बल जनास मुक्त करणा–या, मांगल्य वाढविणा–या पात्रांशी करणे केशवसुतांना गरजेचे वाटते.

**धीरा ! उन्नतिचे पथांत उमदा राउत तू चालरी !**
**नही काय ! करुनि चीत अगदीं ती रुढीका राक्षरी,**
**टांकानें आपुल्या दुराग्रह जुना मर्मी तसा विंघुनी,**
**स्त्री जातीस जातीस असाच काढ वरती घे किर्ति संपादुनी !**

येथें टांक हा शब्द साहित्य व्यवहार सुचवितो या दुराग्रहाच्या मर्मावरच या टाकाने आघात करणारा आघात करणारा हा विचार पुन्हा एकदा कलावंताची समाजनिष्ठा काव्यनिष्ठे इतकीच महत्वाची असल्याचे घोषित करतो.

सवित्रीबाईनी जेव्हा मुलींना शिकविण्यास सुरुवात केली तेव्हा धर्मबुडाला अस गहजब काहींनी केला. विधवा पुनर्विवाहाला संकुचित धर्मवाद्यांनी शक्य तेवढा विरोध केला. स्त्रीचे घराबाहेर पडणेही विपरीत समजल्या जाण्याचा तो काळ लक्षात घेता केशवसुतांनी हरिभाउ आपट्यांमध्ये समानधर्म शोधला व त्यास जाहीर शाबासकी दिली, या गोष्टीस फार महत्त्व आहे. शिवाय तत्कालीन सुधारकांना टांक हे साधन उपलब्ध होते नवशिक्षितांपर्यंत आपले विचार व्यक्त करण्यास तो प्रभावी मार्ग होता. हा टांकाचा प्रभावही टांकाने आपुल्या——— विंधुनी या ओळीत व्यक्त होतो.

अंगभूत सहानुभूतीच्या जोरावर या सर्व शोषितांशी केशवसुंत आपुलकीचे नाते प्रस्थापित करतात

**पक्षी जसे हे घरट्यास चालती घेवोनि चारा आपुल्या पिलांप्रती**
**घेवोनि अन्ना, तुमचा तसा पिता येईल तो लौकरि हो, रडू नका !**
**हे लाडके ! आणि लाडक्यांनी ! दांवू तुम्हां तोंड कसे फिरोन ?**
**जन्मास मी काय म्हणोनी आलो ? येतांच वा कां न मरोनि गेलो ?**

हे उद्‌गार त्यांचे विद्‌ध अंतकरणा व्यक्त करतात. समाजनिष्ठा ही त्यांच्यासाठी काव्यनिष्ठेचाच एक भाग आहे. कवीने गद्यग्रथित जग तुच्छ लेखताच गाणारे शब्द सारे दूर देशास उडून जातात. स्फूर्तिमध्येही हाच विचार आहे तो पुढे पाहू या.

स्वर्गसमक्षता या शीर्षकाखाली विवेचन करताना केशवसुतांना कालनुरूप, सृष्टिनियमांस अनुसरणारे, बदल रूढींमध्ये अपेक्षित असल्याचे पाहिले.

**सृश्टीने निज भृत्य एक बलवान रुढीवरी प्रेशिला,**
**त्याला लौकिक मूर्ख हा कलि अ□ा नांवे म्हणू लागला !**
**त्याने कागद घेउनी सहज जे रुढीकडे फेकीले,**
**त्यांही आसन तें तिचे डळमळू आहे पहा लागते !**

या कवितेतील कागद हे काव्यादी कला नि शास्त्रे यांचे प्रतीक आहे. त्यांच्या आधरेच मानवाची भौतिक प्रगती शक्य होते.

**धर्माचे माजवूनी डम्बर**
**नीतीला आणिती अडथळे,**
**विसरुनीया हे जातात खुळे,**
**नीतीचे पद जेथे न ढळे**
**धर्म होतसे तेथेच स्थिर,**
**हल्ला करण्या तर दंभा तर बंडावर**
**शुरांनो, या त्वरा करा रे !**

समतेचा ध्वज उंच धरा रे !
नीतीची द्वाही पसरा रे
तुतारिच्या ह्या सुरा बरोबर
नियमन मनुजासाठी मानव
नसे नियमनासाठी जाणा,
प्रगतिस जर ते हाणी टोणा,
झुगारुनि तें देउनि, बाणा
मिरचा निज ओजाचा अभिनव !

तुतारी मध्ये त्यांच्या सामाजिकतेची सर्व वैशिष्ट्ये प्रकटतात.धर्मापेक्षा नीतिमूल्ये आणि नियमांपेक्षा मानव श्रेष्ठ असल्याची घोषणा या तुतारीने केली आहे. समतेचा ध्वज धरुन नीतीची द्वाही फिरविण्यासाठी ही घोषणा आवश्यक होती. कर्मकांडात फसलेला, अवरुद्ध झालेला धर्म, गतानुगतिक म्हणून कालबाह्य झालेला धर्म मानवाचे नियमन करतो. मानवापेक्षाही श्रेष्ठ ठरतो. नेमकी हीच गोष्ट केशवसुतांच्या संतापास कारणीभूत होते. त्यांना धर्मपेक्षा नीती महत्त्वाची वाटते याचा अर्थ असा की धर्मापेक्षा माणूस महत्वाचा. हा विचारच क्रांतिकारी आहे आणि तो कमालीच्या आक्रमकतेने, युयुत्सवृत्तीने कवीने मांडला आहे. माणूस नियम करतो याचाच अर्थ माणूसच मूल्येही ठरवितो आणि या मूल्यांवरच त्याचा धर्म स्थिर व्हावा अशी ही रास्त अपेक्षा आहे. देव दानवांच्या युद्धामध्ये देवांच्या मदतीस युद्ध सेना घेउन कवी निघतो. देव याचा अर्थ सत्प्रवृत्ती या सत्प्रवृत्तीला बहुधा न मानविणारी प[illegible] जिच्या समर्थनार्थ महाभारत सारख्या ग्रंथातून ढीगभर पुरावे शोधता येतील अशी दुष्ट संहाराची भाषा केशवसुता करतात. हेही विशेष, याच कवितेत भारताला काहीसा न मानवलेला संघशक्तीला विचार कवी मांडतो. पुरुषार्थाची युद्धसिद्ध करणारी नवी परिभाषा मांडतो. निसर्गाशी निसर्गाशी भिडण्याची भाषा करीत उंच मनोरे उठविण्याची आकांक्षा धरतो. डॉ. द. भि. कुळकर्णींनी[1] तुतारी हे युयुत्सू वीरांचे संचलन गीत वाटते.धर्म, देव, रुढी, निसर्ग, संघशक्ती असे अनेक घटक या कवितेचा भव्य आशय उभा करतात.तुतारी या युद्धवाद्याद्वारे वीरांना चेतवून एक तुंबळ रणसंग्राम केशवसुत घडवू पाहतात. जुने जाऊ द्या मरणा लागुनि, जाळुनि किंवा पुरुनि टाका असा जळजळीत उद्‌गार काढणारा कवी
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी–
काय नव्हे ती श्रेयस्कारक – ?

असा परिपक्व विचार करतो. गतशतकांमध्ये झालेल्या पापांचे क्षालन करण्यासाठी रुधिर सिंचना ची निर्दय अत्यंत कठोर पण न्याय्य अपेक्षा केशवसुतांना आहे.

**एक वैभवा थोर भोगिता ! धुळीमध्ये तो अन्य लोळतो काय कसे ही स्थिती बरोबर ?**
**देव कशाचे ! अश्रु जे पिती कुरतन नकां ते असुरांहुनि,**
**स्त्री वर्गाला दास्यी पडपुनि दासीपुत्राचि मानव होतो ! स्त्रीला अज्ञानांत ठेवितो,**
**[illegible]णामी दुर्दशेस जातो. धिक्कार अशा चाली लागुनि,'**
**'पडली छाया मनुजाची जर विटाळ होतो तर मनुजाला, व्हावी स्नानचि सचैल त्याला,**
**काय म्हणावे या मूर्खाला नरेंच केला हीन किती नर[2]**

हा सगळा तपशील मानवी प्रतिष्ठेसमोर देवही तुच्छ मानणारी केशवसुती वृत्ती प्रकट करतो स्त्री–समता, स्त्री शिक्षण, विधवाविवाह समर्थन, अमानवी अस्पृश्यता हे सगळे विषय येथे आले आहेत. मानवी दुःखाली अटळता पूर्व जन्मातील पाप पुण्याच्या आधारे स्वीकारणे त्यांनी साफ धुडकावून लावले आहे.

केशवसुतांची ही ऊर्जस्वल कविता न्याय, समता, बंधुता इत्यादी सामाजिक विचारांच्या दृष्टीने व समजाला प्रगतीकडे नेण्याच्या दृष्टीने युक्त असली, तरी ती काव्य म्हणून पूर्णतया निर्दोष नाही. तिचे स्वरूप व्यासपीठावरील वक्तृत्वा सारखे आहे.––––– तिच्यात संतापाबरोबर शिव्याशाप आहेत वीराचा स्थायी भाव उत्साह आहे. क्रोध नाही, हे या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. वीराने तुतारीची मागणी करणे, तिच्या तीव्र आवाजाला किंकाळी म्हणणे जुने जाऊ द्या मरणालागुनि असा अविवेकी आदेश देउन विसंगती निर्माण करणे इत्यादी दोष कुणालाही सहज पटतील असे आहेत.[3]

हा भ. श्री. पंडितांचा उतारा जुनी काव्यसमीक्षा कशी सांकेतिकता प्रधान होती हे दर्शविणारा आहे. जुने जाऊ द्या मरणा लागुनी याचा अर्थ जुने ते सर्व खोटे, कालबाह्य असा नव्हे तसेच नवे ते सर्व स्वीकारणीय

असाही नव्हे. केशवसुतांना एवढा विवके नव्हता, असे भ. श्री.पंडित कसे काय समजतात ? कोण जाणे ? शिवाय नवी निष्पत्ती जुन्यातूनच व्हावयाची आहे.

केशवसुतांच्या तुतारीचा एक विशेष असा की त्यात बोधवचने म्हणून शोभणा–या पंक्तीही आहेत. जुन्या भूमिवर नवी टवटवी, जुना समुद्रहि नवा रत्नें वी, जुने जाउं द्या, मरणा लागुनि, अर्थात विवेक स्वरूप करुनच प्राप्तकाल हा विशाल भूधर, पुरुषार्थ नव्हे पडणे रखडत, धीराला दे प्रसंग हिम्मत, नियमन मनुजासाठी मानव नसे नियमनासाठी नीतीचें पद जेथें न ढळे धर्म होतसे तेथेच स्थिर दृ

**अडवतील जर देव तरी**
**झगडू त्यांच्याशी निकरी**
**हार न खाउ रतीभरी !**
**देवदानवां नरे निर्मिले, हे मत लोका कळवूं द्या !**

या कवितेतही देवदानवांना माणसाने निर्मिले असा जडवादी विचार आहे आणि मानवी प्रतिष्ठेसाठी त्यांच्याशी झगडायला कवी सिद्ध आहे.

**बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे**
**उठवुनि देउनि, जुलुमाचे करूं पहा तुकडे तुकडे !**
**महादेव ! हर हर ! समराचा गर्जत तो वा–यावरती**
**येउनि घुमतो आमुच्या कर्णी–निजती ते ठराचि मरती**
**उठा ! उठा ! बांधा कमर !**
**मारा किंवा लढत मरा !**
**सत्त्वाचा उदयो स्तु करा !**

---

**पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करा विधीने दिली असे,**
**टेकुनि ती जनताशीर्शावरि जग उलथुनिया देउ कसे !**

वरच्या कडव्यात युद्धाची भाषा आहे तर खालच्या कडव्यात हे युद्धनेतृत्व कवीने जाणीवपूर्वक स्वीकारण्याची स्थिती. काव्यादी कलांची समजासन्मुखता ही अपरिहार्य आहे. ही समजासन्मुखता विधि–मान्य असल्याचाही त्यांना विश्वास आहे. समाजकांतीची ही पोकळ घोषणा नाही तर पद्यपंक्तीची तरफ आणि समूह वा जनता अशी युती असल्याने केशवसुतांनी कांतीला शक्यतेच्या कोटीत आणले आहे. हा तरफ शब्दही वैशिष्ट्यपूर्णच. पदार्थविज्ञानामधील ही तरफ किमान शक्तीचा कमाल उपयोग करणारी. पद्यपंक्तीची तरफ म्हणजे समूहसन्मुख होताच कवितेत येणारी प्रचंड शक्ती होय.

**मूर्तिफोडा, धावा ! फोडा मूर्ति,**
**आतील संपत्ति फस्त करा !**

असा जिवाचा थरकाप उडविणारी घोषणा ते करतात. प्रतिगामी रूढींबद्दलचा द्वेष, त्वेष त्यांना या रुढीविरुद्ध युद्ध करण्यास प्रवृत्त करतो. ही युद्धाची भाषा, युद्धाचा आवेश तुतारी, स्फूर्ति, मूर्तिभंजन या कवितांमध्ये शेवटपर्यंत तोलून धरल्या जातो. या आवेशामुळे या कवितांची आवाहक क्षमता, परिणामकारकता, कैक पटींनी वाढली आहे. मूर्ती फोडणारा कवी मूर्ती न विकण्याचीही भाषा करतो. या रुढींच्या आधारे पोट भरणारा वर्ग केशवसुतांना खुपतो या पोटभरुंनी स्वार्थासाठी चालविलेल्या या रुढींमुळे बराच मोठा जनसमुदाय दुःख भोगतो याबद्दलाची चीड, या स्वार्थी लोकांना हरामखोर, चोर अशा शिव्या हासडून व्यक्त केली जाते. महत्त्वाचे असे की मूर्ती फोडणारा कवी मूर्ती जोडण्याचीही भाषा करतो. जुनाट रुढींना जाळा, पुरा, मरु द्या म्हणताना जुन्यातून जी निष्पत्ती नवी काय नव्हे ती श्रेयस्कारक ? असा परिपक्व विचारही मांडल्या जातो. केवळ अमानवी व्यवस्था नष्ट करणे आणि ध्वंसनताच विजय मानणे अशी अपरिपक्वता कुठेही नाही प्राप्त काल हा विशाल भूधर आहे, हे आव्हान म्हणून स्वीकारले जाते. सुंदर लेणी खोदण्याचा कार्यकम त्यातूनच येतो.

71

गोफण ——— या कवितेमध्ये पूर्वीच्या आर्यांचा बडिवार गाउनि निज षंढत्वा दाखविण्यां–यांचा धिक्कार आहे. केशवसुतांचे मन भूतकालीन ओझ्यातून करो मुक्त होते, हे येथे दिसते. अव्वल आंग्ल अमलामध्ये पुनर्जीवनाची जी एक लाट आली होती त्याबद्दल केशवसुत नाखुश दिसतात.

तुतारी, स्फूर्ति, मूर्तिभंजन, गोफण — ही ध्वंसानाची कविता तर अंत्यजा —, मजुरावर —, पण लक्षांत कोण —, आगबोटीच्या काठाशी — हा या कवितेचा अर्थपूर्ण आशयविस्तार आहे या कविता केशवसुतांच्या मानवसन्मुखतेची महती सांगणारी स्तोत्रे आहेत. मानवासाठी धर्म, देव, रुढी शास्त्रे यांच्यावर कठोर प्रहार करणे आणि न्याय व समताधिष्ठित मानवी व्यवस्था रचणे हा त्यांच्या सामाजिक कवितेचा गाभा आहे.

तथापि या संघर्षशील वृत्ती नवा शिपाई मध्ये उच्चतर पातळीवर स्थिर होतात, जात, पंथ, धर्म या संकुचित वर्तुळाला भेदून ......

**जिकडे जावे तिकडे माझी भावंडें आहेत,**
**सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत**
**कोठेही या डोईवरती दिसतें नीलाम्बर तें !**
**ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ आम्हातुनि वाहे !**

———

**पूजितसें मी कवणाला ? तर मी पूर्जी आपुल्याला,**
**आपल्यामध्ये विश्व पाहुनि पूर्जी मी विश्वाला**

———

**लहान मोठें मज नाकळे**
**साधु—अधम हे व्दयहि गळे,**
**दूर जवळ हा भाव पळें ;**
**सर्वच मोठें साधु जवळ, त्या सकली मी भरुनी राहें !**

———

**भ्रान्तीचे साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,**
**प्रेशित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे. ।**

असे भव्य स्तिमित करणारे उड्डाण त्यांची प्रतिभा घेते. सृष्टीशी असलेली परात्मता येथे दूर होते. एकच ओघ आम्हातुनि वाहे हा साक्षात्कार होतो. या गगनव्यापी स्थिती मध्ये मीत्वाची संकुचित वर्तुळे फुटतात. आधी पुष्पाला हात लावायचे भय वाटे तर आता निसर्ग, सृष्टी यासर्वांशी कवीच्या नात्याची पुनर्स्थापना झालेली आहे.

या कवितेमध्ये आध्यात्मिक परिभाषा आहेच. सगुण विश्वामध्ये गुणविशेष स्वीकारणारी अहंस्फूर्ती या गुणविशेषांच्या मर्यादेनेच स्वतंत्र अस्तित्व स्वीकारते. एक अस्तित्व दुस–या पासून असे वेगळे झाले की मग एकमेकांच्या मर्यादा, स्वार्थ एकमेकांना खुपून कलह उत्पन्न होतो. हा कलह मिटवून शांतीचे विशाल साम्राज्य स्थापू पाहणे हे या शिपायाचे कार्य. हे शांती स्थापण्याचे कार्य शिपाई करतो, ही विसंगती नसून अशांति वा अव्यवस्था संघार्षाच्या जोरावरच नष्ट करता येतील असा वस्तुनिष्ठ पावित्रा आहे. हा केवळ स्वतःपुरता आलेला अनुभव नाही. वास्तव वाटणारे, शक्यतेच्या कोटीत असलेले विश्व प्रसंग दोन हात करुन स्थापन करण्याची ही त्यांची वृत्ती आहे. येथे स्वर्भूसंगमही झालला आहे. भलेही हा शब्द या कवितेत ते वापरीत नसो. येथे दिव्यत्वही गवसले आहे. विश्वमानव [4] असे सार्थ नामाभिधान त्यांना स. त्र्य. कुल्ली देतात ते यामुळेच.

केशवसुतांच्या सामाजिक कवितांत भावनांचा उत्कट अविष्कार, अंतःकरणाची तगमग, अस्वस्थता व्यक्त होते, हे खरे असले तरी व्यक्तिविशिष्ट वा व्यक्तिसंबंद्ध अनुभव या कवितांतून व्यक्त होत नाहीत. याचे कारण त्यांची अंतर्मुखवृत्ती होय. अंत्यजा ——— मध्ये विशिष्ट अनुभव रेखाटताना ते फारशे यशस्वी ठरत नाहीत. अनुभवांऐवजी भावनांना या सामाजिक कवितांत प्रधान स्थान आहे.

संदर्भः—

1. द. भि.कुळकर्णी, दोन परंपरा, विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती, 3 जुलै 1993 पृ.116
2. भ. श्री. पंडित, समग्र केशवसुत, व्हिनस प्रकाशन पुणे, आवृत्ती चौथी, जून 1996 पृ. 214
3. कित्ता. पृ. 332

4. स. न्यं. कुल्ली, तीन अर्वाचीन कवी मार्क्सवादी दृष्टिकोन, लोकवाड्.मय गृह प्रकाशन, पहिली आवृत्ती 1989 पृ.66.

72